नि.फौ.ख.क्र.१००/२०२१
सरकार वि. मुकेश
नि.क्र.२०

साक्षीदार क्र **०३** ची सरतपासणी
देवाची शपथ खरे सांगतो
नाव :–पो.ह.राजु विष्णु राठोड,
वय ३८ वर्ष, व्यवसाय– पो.हवालदार
राह. पोलिस स्टेशन बेला.तह.उमरेड जि.नागपूर.

**<u>सरतपासणी सरकारी वकील श्री. जे.एम.बोरकर यांच्या मार्फत</u>**

१. दि.२९/०५/२०२१ रोजी मी पो.स्टे.बेला येथे कार्यरत होतो. सदर दिवशी मी सिर्सी येथे वाहतुक केसेस करत होतो. त्यावेळेस माझ्यासोबत दोन कर्मचारी होते. त्यावेळी आम्हाला एक ट्रॅक्टर येतांना दिसले. त्यावेळी त्याला हात देउन थांबविले सदर ट्रॅक्टरचा नंबर एम.एच.३५ एल.३९२२ असा होता. त्यावेळी सदर ट्रॅक्टर चालकाला नाव, गाव विचारले असता त्याने त्याचे नाव मुकेश लेंढे असे सांगितले. त्याला मालाबाबत विचाले असता व तसेच ट्रॅक्टरमध्ये रेती भरून आहे याबाबत परवाना आहे किंवा कसे असे विचारले असता त्याने परवाना नसल्याचे सांगितले. त्यानंतर मी पंचांना सुचनापत्र देउन पंचनामा केला व पुढील कारवाईकरिता सदरचा ट्रॅक्टर पो.स्टे.ला नेला. सदर ट्रॅक्टरमध्ये एक ब्रास रेती किंमत रूपये ५,०००/– व ट्रॅक्टर व ट्रॉलीची किंमत रूपये ४,००,०००/–असा मुद्देमाल जप्त केला. त्यानंतर कायदेशीर कारवाई करण्याकामी फिर्याद दाखल केली. आता मला फिर्याद दाखविण्यात आली त्यातील मजकूर खरा व बरोबर असुन त्यावर माझी सही आहे त्यास **निशाणी क्र.२१** देण्यात आला. आता मला प्रथम खबर अहवाल दाखविण्यात आला त्यातील मजकूर खरा व बरोबर असुन त्यावर माझी सही आहे त्यास **निशाणी क्र.२२** देण्यात आला. मी पंचांना समन्सपत्र दिले होते. आता मला समन्सपत्र दाखविण्यात आला त्यातील मजकूर खरा व बरोबर असुन त्यावर माझी व पंचांची सही आहे त्यास **निशाणी क्र.२३** देण्यात आला. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला त्यातील मजकूर खरा व बरोबर असुन त्यावर माझी व पंचांची सही आहे त्यास **निशाणी क्र.२४** देण्यात आला. घटनास्थळ पंचनाम्यादरम्यान रेतीचोरीबाबत व जप्त केलेल्या ट्रॅक्टरबाबत जप्ती पंचनामा तयार केला. मी घटनास्थळावर रेती व ट्रॅक्टरचे फोटो काढले होते. आता मला सदर फोटो दाखविण्यात आले त्यास आर्टीकल अ देण्यात आले.

**<u>सरतपास संपला.</u>**

**<u>आरोपीतर्फे ॲड. एम.आर.धांडे यांच्यातर्फे उलटतपास सुरू.</u>**

२.  हे म्हणणे खरे आहे की, माझ्यासोबत जे दोन कर्मचारी वाहतुक कारवाईकामी होते त्यांची नावे फिर्यादमध्ये नमुद नाही. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, त्यांचा सनद क्र. नमुद आहे. आता मला फिर्याद दाखविण्यात आली त्यामध्ये सदर कर्मचा–यांचा सनद नंबर नमुद आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर घटनेबाबत किती वाजता कारवाई केली हे फिर्यादमध्ये नमुद नाही. फिर्याद दिल्यानंतर सदर फिर्यादवरून गुन्हा रजि.नंबर पडतो. हे म्हणणे खरे आहे की, फिर्याद ही संगणकावर टाईप केलेली आहे. मी घटनेच्या दिवशी वाहतुक कार्यवाही काण्यासाठी जाण्याबाबत जो आदेश माझ्या वरिष्ठांनी दिलेला होता तो आदेश मी अभिलेखावर दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, दि.२९/०५/२०२१ रोजी मी सरतपासात सांगितल्याप्रमाणे कोणत्याही ट्रॅक्टरवर कारवाई केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, नि.क्र.२३ प्रमाणे मी पंचांना समन्सपत्र दिले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी पंचांसमक्ष घटनास्थळ व जप्तीपंचनामा तयार केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, नि.क्र.२५ प्रमाणे जप्तीची कार्यवाही केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आर्टीकल अ हा फोटो मी काढलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीविरूध्द खोटी फिर्याद दाखल केली. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासातील मजकूर खोटा सांगितला आहे.

**<u>उलटतपास पुर्ण.</u>**

**<u>फेरतपास काही नाही.</u>**

वा.दा.ब.अ.सा.  समक्ष

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड
दि ०५.०८.२०२५

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड